**प्रेसनोट दि २१/०३/२०१९**

**कोथरूड पोलीस ठाणे पुणे**

**गुन्हयातील आरोपीस १२ तासाचे आतमध्ये अटक केलेबाबत**

आज दि.२०/०३/२०१९ रोजी दाखल झालेला कोथरूड पोलीस ठाणे गुरनं.९६/२०१९,भादवि कलम ३७६(आय) सह बाल लैगिक अत्याचार कायदा २०१२ चे कलम ३,४ व ८ या गुन्हयातील आरोपी नामे प्रभाकर गिरंजे याचा तपास पथकाचे पोउनि एस बी पाटील, सपोफौ दत्ता शिंदे, सपोफौ शेख, पो.हवा.जोरी, पोना.कुदळे, पोशि.क्षिरसागर, पोशि.टेकावडे, पोशि.कानगुडे, पोशि.निकाळजे, पोशि.पवार, व पोशि.काळे यांनी त्याचा सुतारदरा, जय भवानीनगर, किष्कींदानगर भागात शोध घेतला असता, सदरचा आरोपी त्यांना मिळून आला नाही. त्यानंतर सदर आरोपीचा तांत्रिक तपास केला असता तो अटक टाळणेकरीता वारंवार आपले ठिकाण बदलत असल्याचे आढळून आले. पोउनि.एस.बी.पाटील यांना सदर आरोपी हा त्याचे मुळगाव चालेगाव,मुळशी येथे गेला असल्याची खास बातमीदारांकडून माहीती प्राप्त झालेवरून,पोउनि.पाटील यांनी स्टाफसह मु.पो.चालेगाव,ता.मुळशी,जि.पुणे येथे जावून नमूद भागात आरोपीचा शोध घेवून त्यास ताब्यात घेवून पोलीस ठाणे येथे आणून त्यांच्याकडे तपास केला असता,त्याने गुन्हा केल्याची कबुली दिलेवरून आरोपी प्रभाकर भिका गिरंजे,वय-५४ वर्षे,रा. मराठे कॉलनी,काळुबाई मंदीराजवळ,सुतारदरा,कोथरूड,पुणे यास आज दि.२०/०३/२०१९ रोजी दाखल गुन्हयात अटक केली आहे.

अशा प्रकारे पोउनि एस.बी.पाटील, सपोफौ.दत्ता शिंदे, सपोफौ शेख, पोहवा.जोरी, पोना. कुदळे, पोशि.क्षिरसागर, पोशि.टेकावडे, पोशि.कानगुडे पोशि.निकाळजे, पोशि.पवार, व पोशि.काळे यांनी नमूद गुन्हयातील आरोपी १२ तासाचे आत अटक करून उत्तम कामगिरी केली आहे.

(प्रतिभा जोशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे